# RR+PR

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ**

**Code No. : 85-M Subject : SOCIAL SCIENCE**

**( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )**

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ + ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater + Private Repeater )**

**सामान्य सूचना :**

i) या प्रश्नोत्तर पत्रिकेत वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 56 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे उत्तरे लिहावे.

v) विद्यार्थ्यांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृति, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थ्यांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

viii) उजवी कडील धारा या मध्ये दिलेल्या जागेत काही लिहू नका.

I. प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेले आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. बरोबर असलेला पर्याय निवडुन प्रश्नाखाली उत्तरासाठी दिलेल्या जागेमध्ये इंग्रजी मुळाक्षरासह पूर्ण उत्तर लिहा : $15 \times 1 = 15$

1. या पद्धतीप्रमाणे जमीनीचा मालकी हक्क शेतक-याकडे असे. जमिनीच्या मोजमापानुसार कर द्यावा लागत असे

   (A) रयतवारी पद्धत (B) महालवारी पद्धत

   (C) जमीनदारी पद्धत (D) कायम जमीनदारी पद्धत.

2. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष हे होते.

   (A) डॉ० राजेन्द्रप्रसाद (B) डॉ० बी. आर. आंबेडकर

   (C) सरदार वल्लभभाई पटेल (D) सरोजनी नायडू.

3. गोवा पोर्तुगीजाकडून स्वतंत्र्य झालेले वर्ष

   (A) 1954 (B) 1963

   (C) 1961 (D) 1971.

4. 1966 साली चीनमध्ये झालेल्या सांस्कृतीक क्रांतीचे कारण

   (A) मंच्युरियामधून जापनिजांची हाकालपट्टी

   (B) मंच्युंच्या सत्तेची समाप्ती

   (C) बौद्ध मंदिरांचा नाश आणि धार्मिक श्रद्धाळूंना मारणे

   (D) लोकशाहीची स्थापना.

5. जर्मनीचा हुकुमशहा हा होता

(A) हिटलर (B) मुसोलिनी

(C) डी गॉल (D) लेनीन.

6. ग्रामीण स्त्रीयांच्या विकासासाठी आमलात आणलेली योजना

(A) स्वयं सिद्धा

(B) राष्ट्रीय महिला विमोचन

(C) बालिका समृद्धी योजना

(D) स्त्री शक्ती.

7. स्त्री सशक्तीकरण वर्ष म्हणून कोणत्या वर्षी घोषित करण्यात आले ?

(A) 2001 (B) 2005

(C) 1998 (D) 2004.

8. SAARC चे मुख्यालय या ठिकाणी आहे.

(A) कोलंबो

(B) काठमान्डू

(C) ढाक्का

(D) दिल्ली.

9. कोरोमंडल किनारपट्टीवर या काळात पाऊस पडतो

(A) उन्हाळ्याचा मोसम

(B) मान्सून परतीचा मोसम

(C) हिवाळा मोसम

(D) दक्षिण-पश्चिमी मान्सून मोसम.

10. मँग्रोव्ह अरण्यात आढळणा-या आधांतरी मूळे असणा-या झाडाचे उत्तम उदाहरण

(A) चंदन

(B) सागवान

(C) वडाचे झाड

(D) आंबा.

11. पेट्रोलियमला द्रव सोने म्हणतात, कारण

(A) त्याचा प्रत्येक आर्थिक कार्यात उपयोग होतो

(B) ते द्रव रूपात असते

(C) भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे

(D) ते सोनेरी रंगाचे आहे.

12. भारताचा रू-ह ( Ruhr ) प्रदेश हा आहे

(A) बिहार

(B) पश्चिम बंगाल

(C) छोटा नागपूर प्रदेश

(D) झारखंड.

13. भारतीय धान्य साठा केंद्र

(A) मैसूर (B) बिदर

(C) गुलबर्गा (D) हापूर.

14. औद्योगिक आराखडा केंद्र प्रामुख्याने यासाठी स्थापन करण्यात आली.

(A) भारतीय स्थितीतील यंत्र सामुग्रीच्या आराखडासाठी

(B) आर्थिक मदत पुरविण्यासाठी

(C) बाजारपेठेची मदत पुरविण्यासाठी

(D) तांत्रिक शिक्षण पुरविण्यासाठी.

15. कर्नाटकातील अंकोला हे या चळवळीसाठी प्रसिद्ध होते

(A) दारू दुकानांचा निषेध

(B) अरण्य सत्याग्रह

(C) मीठाचा सत्याग्रह

(D) ध्वज सत्याग्रह.

II. योग्य उत्तराने रिकाम्या जागा भरा : $5 \times 1 = 5$

16. सर्वात प्रथम समुद्र प्रवासासाठी ............................ या देशाने सुरवात केली.

17. भारतामधील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण ....................... .

18. वस्तूसाठी वस्तू देण्याच्या पद्धतीला ........................ म्हणतात.

19. सरकारने भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यासाठी बांधणी केलेली संघटीत व्यवस्था ................................ ही आहे.

20. अमेरिकेने सन् 2002 वर्षामध्ये अफगानिस्तानातील पराभूत केलेली संघटना .................................. आहे.

III. 21. खालील दिलेल्या **A यादी** बरोबर **B यादींच्या** योग्य जोड्या जुळवा : 5 × 1 = 5

| **A - यादी** | **B - यादी** |
|---|---|
| (a) आर्य समाज | (i) ज्योतिबा फुले |
| (b) सत्यशोधक समाज | (ii) 1950 |
| (c) अलीगड चळवळ | (iii) दयानंद सरस्वती |
| (d) भारतीय घटना आमलात आली | (iv) सर सय्यद अहमद खान |
| (e) भारतीय रिजर्व बँकची स्थापना | (v) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा (इ० स० 1947) |
| | (vi) भारत सरकारचा कायदा (इ० स० 1935 ) |
| | (vii) डॉ० आत्माराम पांडूरंग |
| | (viii) स्वामी विवेकानंद. |

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **एका** वाक्यात लिहा : 9 × 1 = 9

22. 'आधुनिक मैसूर राज्याचा शिल्पकार' कोणाला म्हणतात ?

23. चीनमधील मंचूच्या सत्तेचा शेवट केलेल्या नेत्याचे नांव काय ?

24. अमेरिकेने दुस-या महायुद्धात का सहभाग घेतला ?

25. व्हेटो ( Veto ) अधिकार म्हणजे काय ?

26. प्रामुख्याने अमेरिकेचा गांधी म्हणून कोणाला ओळखतात ?

27. 'मानव अधिकारांची' गरज का आहे ?

28. सुंदरबन हे नांव कसे मिळाले?

29. गाळ काढण्याची क्रिया म्हणजे काय ?

30. हरित क्रांती म्हणजे काय ?

V. खालील प्रश्नांची उत्तरे **दोन** वाक्यात लिहा : 16 × 2 = 32

31. मद्रासच्या तहाच्या अटी कोणत्या होत्या ?

32. रणजितसिंगला शिखांचा प्रसिद्ध राजा असे का म्हणतात ?

33. वाहतूक आणि दळणवळणाच्या व्यवस्थेमुळे भारतीयांच्यात ब्रिटीशाविरुद्ध एकात्मतेच्या भावनेचा विकास कसा झाला ?

34. इसूरच्या चले जाव चळवळीबद्दल माहिती लिहा ?

35. पटेलांनी हैद्राबादमध्ये पोलीस कारवाई करण्याचे का ठरविले ?

36. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळातील प्रतिस्पर्धी आघाडी पद्धतीबद्धल वर्णन करा.

37. AGMARK ची सक्ती का करण्यात आली ?

38. संयुक्त राष्ट्र संघांच्या ( UNO ) महत्वाच्या शाखा लिहा.

39. भारतीय घटनेमध्ये मानवी अधिकारांचे संरक्षण कसे केले जाते ?

40. पश्चिम किनारपट्टी आणि पूर्व किनारपट्टी यामधील फरक लिहा.

41. बॉक्साईट खनिजाचे उपयोग लिहा.

42. सीमेंटचा वापर हा राष्ट्राची प्रगती दर्शवितो. कसे ?

43. सध्याच्या काळात अंतर जल वाहतुकीचे महत्व कमी का होत आहे ?

44. लघू उद्योग धंदे कसे कार्य करतात ?

45. तिस-या पंचवार्षिक योजनेच्या अपयशाची कारणे कोणती ?

46. अलिप्ततावादी चळवळीचे नेते कोण होते ?

VI. खालील प्रश्नांची उत्तरे **सहा** वाक्यात लिहा : 6 × 3 = 18

47. भारतातील पोर्तुगीज सत्तेच्या-हासाची कारणे कोणती ?

48. 1857 च्या बंडाची अपयशाची कारणे कोणती ?

49. महिलांच्या कल्याणासाठी सरकारने उचललेली पाऊले कोणती ?

50. जमीनीची धूप नियंत्रण करण्याच्या पद्धती कोणत्या ?

51. व्यापारी शेतीपेक्षा मिश्र शेती वेगळी कशी आहे ?

52. किरकोळ व्यापा-याकडून कोणत्या सेवा पूरविल्या जातात ?

VII. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ** वाक्यात लिहा : 3 × 4 = 12

53. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सुभाष चंद्र बोस यांच्या कार्याचे/भूमीकेचे वर्णन करा.

54. भारताचे रशियाबरोबर चांगले संबध आहेत. वर्णन करा.

55. भारतीय शेती मागासलेपणाची कारणे कोणती आहेत ?

VIII. 56. भारताचा नकाशा काढून त्यात खालील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

(a) कावेरी नदी

(b) भाक्रा नानगल योजना

(c) कांडला.

**अंध विद्यार्थ्यांकरिता पर्यायी प्रश्न : ( प्रश्न संख्या 56 च्या ऐवजी )**

भारतीयांच्या जीवनात हिमालय पर्वतांचे महत्व कोणते ? 4